## दाव्यातील नि.क्र. १३५ वरील आदेश

## (पारित दिनांक १७ नोव्हेंबर,२०२२)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ व कलम १५१ नुसार दाव्यात व नि.११६ वरील अर्जामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदारांचे कथन असे आहे की, सदरचा दावा हा फाळणीबारा करणेकामी, अतिक्रमण काढुन मिळण्यासाठी व मनाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदार यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी दिलेला नि. ०५ वरील अर्ज या न्यायालयाने नामंजुर केलेला आहे. सदरचा नि. ०५ तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर करतांना या न्यायालयाने दावा मिळकतीमधील वादी यांनी विकलेले १२ आर क्षेत्राच्या स्पष्ट चतुःसिमा नमुद केल्या नसल्याचा तांत्रीक दोष निरिक्षणामध्ये नोंदविलेला आहे. वादी क्र. १ व २ यांच्या वडीलांनी रे.क.नं. ५९/२००३ मधील हुकूमनाम्याप्रमाणे पाटस येथील गट नं. ३५२ पैंकी १२ आर क्षेत्र प्रतिवादी क्र. ७ यांना विकले होते. प्रतिवादी क्र. ७ यांनी ते क्षेत्र प्रतिवादी क्र. २०३ व २०४ यांना विक्री केलेले असुन त्यांचे नाव दावा मिळकतीचे ७/१२ सदरी नोंद झालेले आहे व उर्वरित ८२ आर क्षेत्रास वादी यांचे नावाची नोंद न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे झालेली आहे. वादी क्र. १ व २ यांच्या वडीलांनी वर नमुद केलेले १२ आर क्षेत्र विक्री केल्याबाबतचा उल्लेख दाव्यातील कलम ४ व ५ मध्ये वादी यांनी केलेला आहे. परंतु, त्याच्या सविस्तर चतुःसिमा न्यायालयास अपेक्षित असुन त्या दाव्यामध्ये नमुद करणे नजरचुकीने राहुन गेले आहे. सदरचा दोष तांत्रीक स्वरुपाचा असुन तो दुर करणे न्यायनिर्णयाचे कामी गरजेचे आहे. तसेच वादी यांनी नि. ११६ वर कोर्ट कमिशनर नियुक्तीबाबत अर्ज दाखल केलेला असुन त्यामध्ये देखील दावा मिळकतीचे वर्णनामध्ये चतुःसिमा दुरुस्त होणे गरजेचे आहे. त्यामुळे त्याअनुषंगाने प्रस्तुत दाव्यामध्ये व नि. ११६ वरील अर्जामध्ये दुरुस्ती होण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेला आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास नि.१३७ वर म्हणणे दाखल करुन संपूर्ण मजकुर नाकारलेला आहे. प्रतिवादी यांचे म्हणण्याप्रमाणे वादींनी सुचविलेली दुरुस्ती ही बेकायदेशीर आहे. वादी यांनी दिलेला अर्ज हा त्यांच्या दाव्यातील दोष भरुन काढण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी सुरवातीलाच त्यांचे जबाब व कैफियतीमध्ये वर नमुद १२ आर क्षेत्राचे चतुःसिमा चुकीचे असल्याबाबत हरकत घेतलेली आहे. परंतु, त्यावेळी दावा दुरुस्त न करता नि. ०५ अर्जाची सुनावणी झाल्यानंतर व त्याचा निकाल विरोधात गेल्यानंतर दाव्यातील दोष सुधारण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जातील कलम २ मधील मजकुर पाहता वादींना सदर १२ आर क्षेत्राचे चतुःसिमा प्रस्तुतचा दावा दाखल करण्यापुर्वीच माहिती असल्याचे दिसुन येते. त्यानंतर सदर १२ आर क्षेत्राचे वादी यांनी नमुद केल्याप्रमाणे पुढे खरेदीखते झालेली आहे. असे असतांना दावा दाखल करतांना वादी यांनी दावा मिळकतीचे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ३ प्रमाणे निश्चित वर्णन न देता मोघम वर्णनाच्या आधारे मनाईचा दावा दाखल केलेला आहे व न्यायालयाच्या आदेशानंतर प्रस्तुतची दुरुस्ती सुचविलेली आहे. त्यामुळे वादी म्हणतात त्याप्रमाणे सदरची सुचविलेली दुरुस्ती नजरचुकीने राहुन गेलेली दुरुस्ती किंवा तांत्रीक स्वरुपाचा दोष नसुन न्यायालयाच्या आदेशानंतर निर्माण झालेली पोकळी भरुन

काढण्याकरीता सुचविलेली दुरुस्ती आहे. तसेच वादीचा नि. ११६ वरील दिलेल्या अर्जावर आदेशासाठी प्रस्तुतचे काम नेमले असतांना प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिलेला आहे. वादी यांनी सुचविलेल्या दुरुस्तीप्रमाणे त्याच चतुःसिमा असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे वादीला न्यायालयाच्या आदेशाचा गैरवापर करुन गटाचा फाळणीबारा नसतांना व सरकारी मोजणी नसतांना त्यांचे क्षेत्राची विभागणी करुन घ्यायची आहे हे दिसुन येते. दाव्यात सुचविलेली दुरुस्ती व दावा मिळकतीच्या चतुःसिमा या वेगवेगळया आहेत. त्याबाबत प्रतिवादींनी त्यांचे कैफियतीमध्ये हरकत घेतलेली आहे व चतुःसिमांवरुन वादी यांचा नि. ०५ वरील अर्ज नामंजुर झालेला आहे. त्यामुळे कोणताही कागदोपत्री पुरावा नसतांना चतुःसिमेबाबतची दुरुस्ती वादी हे सुचवु शकत नाहीत व सुचविलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार आहे. वादीचा अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादीच्या बचावास बाधा येणार असुन प्रतिवादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे सुचविलेली दुरुस्ती बेकायदेशीर असल्याकारणाने वादीचा अर्ज खर्चासह नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

०४. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. अर्जदाराचे कथन व पटलावरील कागदपत्रे पाहता वाद मुद्दे निश्चित करुन त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहेः

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादींनी अर्जामध्ये सुचविलेली दुरुस्ती करुन मिळणेस पात्र आहेत काय? | ... होकारार्थी |
| २) | आदेश काय? | अर्ज मंजुर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा

### वाद मुद्दा क्रमांक १ करिताः

०५. अर्जदार यांनी प्रस्तुतचा दावा फाळणीबारा करणेकामी, अतिक्रमण काढुन मिळण्यासाठी व मनाई मिळण्याकरीता दाखल केला आहे. अर्जदारांचे असे कथन आहे की, वादी यांनी अभिलेखावर नि. ०५ तुर्तातुर्त मनाई मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला होता. सदरचा अर्ज या न्यायालयाने गट नं. ३५२ पैंकी १२ आर क्षेत्राचे चतुःसिमा स्पष्टपणे नमुद केले नसल्याने नामंजुर केला असल्याचे वादीचे कथन आहे. सदरचे १२ आर क्षेत्र या न्यायालयाचे रे.क.नं. ५९/२००३ मधील हुकूमनाम्याप्रमाणे वादी यांचे वडील यांनी प्रतिवादी क्र. ७ यांना यापुर्वीच विकलेले होते. त्यानंतर प्रतिवादी क्र. ७ यांनी सदरचे क्षेत्र प्रतिवादी क्र. २०३ व २०४ यांना विक्री केले. वादी यांच्या वडीलांनी विक्री केलेल्या क्षेत्राबाबतचा उल्लेख दाव्यातील कलम ४ व ५ मध्ये वादी यांनी केलेला आहे. त्यामुळे सदर गट नं. ३५२ पैंकी क्षेत्र १२ आर चे दाव्यातील नमुद चतुःसिमा दुरुस्त करणे व त्यानुसार स्पष्ट चतुःसिमा नमुद करणे गरजेचे व न्यायाचे असल्याचे कथन वादी यांनी केलेले आहे. तसेच वादी यांनी नि.११६ वर कोर्ट कमिशनर नेमणुकीकरीता अर्ज दाखल केलेला असुन जर चुकीच्या चतुःसिमा नमुद करुन सदरचा अर्ज मंजुर झाला तर वादी व

प्रतिवादी यांचे दरम्यान असणारे वाद विषय कधीही संपुष्टात येणार नाहीत. त्यामुळे नि. ११६ वर नमुद कलम १ मधील नमुद मिळकतीचे वर्णनामध्ये देखील दुरुस्ती करण्याकरीता वादी यांनी परवानगी मिळावी याकरीता विनंती केलेली आहे. प्रतिवादी यांचे म्हणण्याप्रमाणे वादी यांना सदर क्षेत्र १२ आर च्या चतुःसिमेबाबत पुर्वीपासुनच माहिती होती. वादी यांनी जाणुनबुजुन दावा दाखल करतांना तसेच प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत व म्हणणे दाखल केल्यानंतर व नि. ०५ चा आदेश होण्यापुर्वी कोणत्याही प्रकारे दावा दुरुस्ती करुन निश्चित दावा मिळकतीचे वर्णन नमुद केलेले नाही. त्यामुळे वादी यांच्या दाव्यास व अर्जास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ३ ची बाधा येते. तसेच वादी यांनी त्यांच्या माहितीमधील असलेली गोष्ट न्यायालयापासुन लपवुन ठेवुन त्यांच्या दाव्यातील दोष भरुन काढण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज उशीराने अभिलेखावर दाखल केलेला आहे. त्यामुळे तो खर्चासह नामंजुर होण्यास पात्र आहे.

०६. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांचे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. त्यांचे म्हणण्याप्रमाणे दाव्यामध्ये नमुद चतुःसिमा या नजरचुकीने चुकीचे नमुद करण्यात आलेले आहेत. सदरची चुक ही तांत्रीक स्वरुपाची असुन त्यामुळे वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान असणारे वादविषय कायमस्वरुपी संपुष्टात येणार आहेत. तसेच प्रस्तुतकामी अदयापही मुद्दे काढण्यात आलेले नसल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील तरतुदीप्रमाणे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र असल्याचा देखील युक्तिवाद वादी यांचेतर्फे करण्यात आला. वादी यांचेतर्फे अभिलेखावर पुढील प्रमाणे मा. नामदार सर्वोच्च न्यायालय व मा. नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांचे न्यायनिवाडे दाखल केले.

***१. सज्जन कुमार विरुध्द राम किशन***

(२००५) १३ एस.सी.सी. ८९

> मा. नामदार सर्वोच्च न्यायालय यांनी सदर न्यायनिवाडयात असा निष्कर्ष काढला आहे की, वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असणारे वादविषय कायमस्वरुपी संपुष्टात येण्याकरीता व त्यांचेदरम्यान अन्य प्रश्न उद्भवु नयेत याकरीता दाव्यातील दुरुस्ती कोणत्याही क्षणी करता येईल.

***२. सिरीला अनिन्हा कार्डोसा विरुध्द आकार क्रिएशन्स आणि इतर***

मनु / एम.एच./१७५४/२०१९

> सदर न्यायनिवाडयामध्ये मा. नामदार उच्च न्यायालय यांनी वर नमुद मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या न्यायनिवाडयाचा संदर्भ नमुद केलेला आहे व त्याअनुषंगाने दुरुस्ती अर्ज मंजुर करण्याकरीता मार्गदर्शक तत्वे नमुद केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, पक्षकारांमधील दाव्यात नमुद असलेले वाद विषय कायमस्वरुपी संपुष्टात आणण्याकरीता योग्य ती दुरुस्ती मंजुर करता येईल. परंतु, तसे करतांना कोणावरही अन्याय होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे.

०७. प्रतिवादी यांचे तर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. त्यांचे कथनाप्रमाणे वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मुदतीमध्ये दाखल केलेला आहे. वादी समजतात ती दुरुस्तीमधील मजकुर वादी यांना रे.क.नं. ५९/२००३ या दाव्यामुळे पहील्यापासुन माहिती आहे. त्यामुळे वादी मागतात ती दुरुस्ती त्यांनी व त्यांचे माहितीपासुन ३ वर्षाचे आत करणे अपेक्षित आहे. या कारणास्तव वादी सुचवितात ती दुरुस्ती मुदतीच्या कायदयाप्रमाणे मुदतीत नसल्याने व दाव्याचे स्वरुप बदलत असल्याने मंजुर करता येणार नाही. त्यामुळे त्यांनी वादीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली. तसेच प्रतिवादी यांचेतर्फे अभिलेखावर पुढील प्रमाणे मा. नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांचे न्यायनिवाडे दाखल केले.

***१. एकनाथ निवृत्ती हेगडकर मयत वारस मैनाबाई लक्ष्मण तांजवे व इतर***

***विरुध्द अगतराव ज्ञानु घोडके मयत वारस कोंडाबाई अगतराव घोडके व इतर***

(२०२२) १ एम.एच.एल.जे. ३१९

***२. अनिल व इतर विरुध्द अनिता व इतर***

मनु/एम.एच./२०१४/२०२१

मा. नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदर न्यायनिवाडयांमध्ये असे निष्कर्ष काढले आहेत की, अर्जदार यांनी सुचविलेली दुरुस्ती ही जर मुदतीच्या कायदयाने बाधित होत असेल तर व सुचविलेली दुरुस्ती ही कोणत्याही संयुक्तिक कारणाविना व विलंबाने निदर्शनास आणले असेल तर असा दुरुस्ती अर्ज मंजुर करता येणार नाही. सदर दोन्ही न्यायनिवाडयांमध्ये मा. नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी सुचविलेली दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलत असेल अथवा त्यातील मागणीमध्ये बदल होत असेल तर सुचविलेली दुरुस्ती कायदयातील प्रचलित तरतुदींनुसार करता येणार नाही असे कथन केलेले आहे.

०८. वरील वादी व प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान विधीज्ञांनी केलेला युक्तिवाद ऐकला. तसेच त्यांनी दाखल केलेले मा. नामदार सर्वोच्च न्यायालय व मा. नामदार उच्च न्यायालय यांचे न्यायनिवाडयांचे अवलोकन केले. प्रतिवादी यांनी अभिलेखावर दाखल केलेले मा. नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांचे न्यायनिवाडयातील घटनाक्रम पाहता त्यामध्ये पक्षकारांनी दुरुस्ती द्वारे नविन मागणी समाविष्ट करणेबाबत अर्ज दाखल केला होता. तसेच सदर मागणी ही मुदतीच्या कायदयाने बाधीत होत असुन मागणीमुळे दाव्याचे स्वरुप पुर्णतः बदलत होते. त्यामुळे मा. नामदार उच्च न्यायालयाने दुरुस्तीची मागणी नाकारल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. परंतु, न्यायालयाने दिलेले मार्गदर्शक तत्वांप्रमाणे वादी प्रतिवादी यांचेतील वाद विषय संपुष्टात येण्याकरीता दुरुस्ती मंजुर करता येते असे दिसुन येते. त्यामुळे प्रतिवादी यांनी दाखल केलेले मा. नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांचे न्यायनिवाडे त्यांचे कथनास पृष्टी देत नाहीत. याउलट, वादी यांनी दाखल केलेले मा. नामदार सर्वोच्च न्यायालय व मा. नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांचे न्यायनिवाडयातील निष्कर्षांचा विचार करता वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असणारे वादविषय कायमस्वरुपी संपुष्टात आणण्याकरीता व त्यांचेदरम्यान अन्य कोणतेही प्रश्न उद्भवु नयेत व त्याअनुषंकगाने दाव्यांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता वादी यांनी सुचविलेली दुरुस्ती करणे न्यायोचित ठरेल.

कायदयातील प्रचलित तरतुदीनुसार दाव्यामध्ये कोणत्याही टप्प्यावर पक्षकारांच्या दरम्यान असलेले वाद अंतिमतः निकाली काढण्याकरीता दुरुस्ती करता येवु शकते. अर्जदारांनी सुचविलेली दुरुस्ती पाहता त्यांना दावा मिळकतीमधील चतुःसिमांचे स्पष्ट उल्लेख करणे गरजेचे आहे. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ व कलम १४१ मधील तरतुदींचा विचार करता वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असणारे वादविषय कायमस्वरुपी संपुष्टात आणण्याकरीता व दाव्यांची व अर्जांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायाचे व गरजेचे ठरते, असे प्रथमदर्शनी दिसुन येते. प्रस्तुतचा वादी यांचा अर्ज कायद्यांर्तगत असुन सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींच्या कथनास कोणतीही हानी पोहोचत नाही. याउलट दाव्याचे अंतिम निकाल गुणदोषावर होण्यास मदतच होणार आहे. परंतु, प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी सन २०१५ मध्ये दाखल केलेला आहे. यावरुन वादी यांनी सदर दावा मिळकतीबद्दल तसेच दाव्यात व अर्जात नमुद मजकुराबाबत योग्य ती माहिती दावा दाखल करतांना नमुद करणे गरजेचे होते. परंतु तसे न केल्याने वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर होण्यास पात्र असुन परिणामतः वाद मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन मी, खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहेः

## आदेश

१. नि. १३५ वरील वादी यांचा अर्ज खर्चासह मंजुर करणेत येत असुन प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रुपये १०००/- वादी यांनी प्रतिवादी क्र. १, ८, १६ व २३ यांना एकत्रीतरित्या दयावा.

२. अर्जदार यांनी अर्जातील सुचविलेली दुरुस्ती दाव्यामध्ये आजपासुन १४ दिवसांचे आत किंवा पुढील नेमलेल्या तारखेपुर्वी करावी, तसेच दुरुस्त दाव्याची प्रत दुरुस्ती केलेच्या दिवशी दाखल करावी.

३. दोन्ही बाजुंनी आदेशाची दखल घ्यावी.

**सही/-**
**(जी.ए.कुलकर्णी)**
४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दौंड,
ता. दौंड, जि. पुणे.

ठिकाणः दौंड,
दिनांक १७/११/२०२२.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.S. Mundhe |
| Court | : | G.A. Kulkarni |
| | | 4th Jt.C.J.J.D., Daund, Dist. Pune. |
| Date | : | 17.11.2022 |
| Judgment signed by the presiding officer on | : | 17.11.2022 |
| Judgment uploaded on | : | 18.11.2022 |